**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे यांचे न्यायालयात**

**गुन्ह्याचा तपशील**

**सं.फौ.ख.नं. ५७८/२०२६ (गु.र.क्र.५३७/२०२६)** **निशाणी क्र.०२**

**आर.पी.एफ. दौंड विरुध्द रामराजसिंह जितेन्द्रसिंह सिकरवार,**

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याची तारीख | : **०६.०३.२०२६** |
| २. | अहवालाचा/फिर्यादची तारीख | : **०६.०३.२०२६** |
| ३. | फिर्यादीचे नांवः | : **यादराम जाट, आरक्षक, आर.पी.एफ. दौंड, जि. पुणे.** |
| ४. | आरोपीचे नांवः | : **रामराजसिंह जितेन्द्रसिंह सिकरवार,**<br>**वयः ३४ वर्षे, धंदा– मजुरी,**<br>**पत्ताः नारायण विहार कॉलनी,**<br>**गोला का मंदीर, ग्वालीयर, मध्यप्रदशे.** |

५. गुन्ह्याचा तपशील –

तुम्ही दिनांक ०६.०३.२०२६ रोजी दुपारी १२.४० वाजण्याच्या सुमारास रेल्वे गाडी क्र.११३०१ मध्ये योग्य परवानगीशिवाय अनिधिकृतपणे खाद्यपदार्थ–पाण्याची बाटलीची विक्री करुन भारतीय रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४४(१) अन्वये शिक्षापात्र गुन्हा केल्याची तोहमत तुमच्यावर आहे.

प्रश्न क्र.१: तुम्हाला दोषारोप पत्राच्या नकला मिळाल्या काय ?

उत्तरः होय.

प्रश्न क्र.२: तुम्हाला आता आरोप वाचुन दाखविला व समजावुन सांगितला तो समजला काय ?

उत्तरः होय.

प्रश्न क्र.३: तुम्हाला गुन्हा कबुल आहे ?

उत्तरः होय, स्वतःच्या इच्छेने गुन्हा कबुल करीत आहे.

स्थळः दौंड.

दिनांकः ०६.०३.२०२६.

समक्ष,

रामराज

-------------

आरोपीची सही

7/3/26,

प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

## कारणमिमांसा

आरोपीला त्याच्यावर असलेला दोषारोप वाचुन दाखविले असता, त्याने गुन्हा स्वेच्छेने कबुल केला आहे. शिक्षेबाबत आरोपीला विचारले असता, त्याने असे निवेदन केले की, तो गरीब असुन कुटुंबातील एकमेव कमवता व्यक्ती असुन कुटूंबाची पालनपोषणाची जबाबदारी आरोपीवर आहे. त्यामुळे, शिक्षा देताना कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली आहे. आरोपीने स्वेच्छेने गुन्हा कबुल केल्यावरुन असे स्पष्ट होते की, त्याला त्याच्या कृतीबाबत पश्चाताप होत आहे. आरोपीचे वय, गुन्ह्याचे स्वरुप विचारात घेता मी खालीलप्रमाणे आदेश पारित करणे न्यायोचित होईल या तथ्यविषयक व विधिविषयक निष्कर्षास मी येत आहेः

## आदेश

आरोपी नामे **रामराजसिंह जितेन्द्रसिंह सिकरवार** यास भारतीय रेल्वे अधिनियम, १९८९ चे कलम १४४(१) अन्वये शिक्षापात्र असणाऱ्या गुन्ह्यांसाठी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ अन्वये दोषी धरण्यात येते व आरोपीला रक्कम रुपये १,०००/- (रुपये एक हजार फक्त) द्रव्यदंडाची शिक्षा देण्यात येते. आरोपीने उपरोक्त द्रव्यदंडाची रक्कम भरण्यास कसुर केल्यास आरोपीस पाच दिवसाची साध्या कैदेची शिक्षा ठोठावण्यात येते.

7/3/26

स्थळः दौंड,
दिनांकः ०६.०३.२०२६.

प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
लोहमार्ग न्यायालय, दौंड, जि. पुणे.

केस नं. 578/2026
दंड रक्कम रु 1000/-
पावती नं. 3597 ने जमा

सहा.अधिक्षक
लोहमार्ग न्यायालय, दौंड